**शपथेवर उलटतपास सुरु...**

**उलटतपास – विधिज्ञ श्री एस.एस. मुतालिक, जाबदारतर्फे**

८.   हे म्हणणे खरे आहे की मी एप्रिल १९८० पासून जाबदाराकडे नोकरीस लागलो हे दर्शविणारा पुरावा याकामी दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही मी लिपिक म्हणून काम करीत होतो हे दर्शविणारा कोणताही कागद दाखल केलेला नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की माझा सेवानिवृत्ती आदेश याकामी दाखल केलेला आहे. जाबदार कारखान्याकडे किती कामगार कार्यरत होते याचा मला अंदाज नाही. परंतु १०००–२००० कामगार असण्याची शक्यता आहे. औद्योगिक विवाद कायदा काय आहे याची मला कल्पना नाही.  त्या कायदयातील तरतुदी मला माहिती नाहीत. जाबदार कारखान्याचे प्रमुख उत्पादन साखर होते. जाबदार संस्था ही सहकार तत्वावर चालणारी संस्था आहे. कारखान्यात वेगवेगळे विभाग आहेत. कारखान्याकडे उत्पादन, इंजिनिअरींग, वाहतूक, प्रशासकीय, कामगार, टाईम, सुरक्षा, सिव्हील, अकौंट, सॅलरी अकौंट विभाग असे विविध विभाग होते.

९.   सुरुवातील कामगारांचे पगार कारखान्यातील कॅशिअरमार्फत अदा केले जात होते. ते पगार कामगारांच्या सहया पे–शीट वर घेवून अदा केले जात होते. हे म्हणणे खरे आहे मी कारखान्याकडे नोकरीस असलेल्या मुदतीत माझे पगाराबद्दल कोणतीही तक्रार कारखान्याकडे उपस्थित केलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की कारखान्याचे ऊसाचे गाळप हे हंगामाच्या मुदतीतच होत असे. बिगर हंगामात कारखान्याचे उत्पादन बंद असायचे. हे म्हणणे खरे आहे की बिगर हंगाम कालावधीत हंगामी कामगारांच्या सेवा समाप्त केल्या जात होत्या. कारखान्यात हंगामी, बिगर हंगामी, रोजंदारी तसेच कायमस्वरुपी अशा वेगवेगळया विभागण्या कामगारांमध्ये होत्या. लिपिकवर्गीय कर्मचा–यांमध्येही हंगामी व बिगर हंगामी अशी विभागणी होती. माझी लिपिक म्हणून कोणत्या वर्गवारीत नेमणूक होती हे दर्शविणारा नेमणूकीचा कागद मी याकामी दाखल

केलेला नाही. कारखान्यात कामगार संघटना कार्यरत होती. साखर कामगार संघटना इंटक या नावाची कामगार संघटना कार्यरत होती. ती संघटना प्रातिनिधिक स्वरुपात कामगारांचे नेतृत्व करीत होती. मी सदर संघटनेचा सभासद होतो. ही संघटना जाबदाराच्या व्यवस्थापनासोबत वेळोवेळी चर्चा व करार करीत होती याची मला माहिती नाही. हे मला माहित नाही की संघटनेने केलेल्या चर्चेनुसार झालेल्या कराराचे लाभ आम्हांला मिळत होते. मी कधीही सदर संघटनेकडे कामगारांच्या लाभांबाबत चर्चा करीत नव्हतो. संघटनेच्या वेळोवेळी मिटींग व्हायच्या त्यावेळी मी सभासद म्हणून सदर मिटींगला उपस्थित असायचो. हे मला माहित नाही की संघटनेच्या माध्यमातून मी सहया करुन लाभ प्राप्त करुन घेत होतो.

१०. मी संघटनेला कधीही सांगितलेले नाही की माझेबाबत काहीही करार कारखान्याशी करु नये. तसेच अशाप्रकारचा कोणताही लेखी अर्ज संघटनेकडे सादर केलेला नाही. संघटनेने यापूर्वी कामगारांच्या प्रश्नांबाबत काही दावे दाखल केले होते किंवा कसे याची मला माहिती नाही. याबाबतची माहिती मी संघटनेकडून अथवा व्यवस्थापनाकडून कधीही घेतलेली नाही.

<u>विधिज्ञ श्री मुतालिक यांच्या विनंतीवरुन उलटतपास तहकूब...</u>

सही/–

सांगली. (दि.मा. पाटील)

सदस्य,

दिनांक – ०३/०२/२०२४. औद्योगिक न्यायालय, सांगली